*प्रतिष्ठेत,*

प्रिय ------------------------------------

आणि ------------------------------------

(येथे विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांची नावे, आई आणि वडील दोहोंची नावे लिहून हा अंक त्यांना वाचावयास देणे.. वाचून दाखविणे.)

लेंड-अ-हँड इंडिया

# कृतीशील संवाद

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ● जुलै २०१५

(फक्त खाजगी वितरणासाठी)

Lend-A-Hand India

## मनोगत

## कौशल्ये शिकूया.. आयुष्य घडवूया..

**सुनंदा माने** (कार्यकारी संचालिका, लेंड-अ-हँड इंडिया, पुणे)

प्रिय मुख्याध्यापक, संस्था-चालक..

प्रिय निदेशक, समन्वयक..

प्रिय विद्यार्थी/विद्यार्थिनी आणि पालक..

सस्नेह नमस्कार!

नविन शैक्षणिक वर्षाचे स्वागत आणि सर्वांना शुभेच्छा!

गेले दशकभर लेंड-अ-हँड इंडिया व्यवसायलक्षी अभ्यासक्रमाचा माध्यमिक शालेय स्तरावरच समाविष्ट करण्याचा अभिनव प्रयोग करीत आहे. गतवर्षीपासून लेंड-अ-हँड इंडिया, 'कृतीशील संवाद' मासिकाद्वारे आपल्या परस्परांतील संवाद अधिक व्यापक झाला आहे.

प्रामुख्याने माध्यमिक शिक्षण अधिक उपयोगी कसे करता येईल, निव्वळ पाठांतर आधारित शिकविण्याच्या पद्धतीपेक्षा सहभागपूर्ण, अनुभवातून शिक्षण कसे देता येईल, ते पुढील शिक्षणासाठी दिशा देणारे कसे करता येईल, त्याच बरोबर शाळा सोडण्याचे प्रमाण आणि नापास होण्याचे प्रमाण कसे कमी होऊ शकेल याचे आता केवळ काही तुरळक प्रयोग नव्हे तर व्यापक स्तरावर सार्वत्रिकरण करण्याचे प्रयत्न केंद्र तसेच राज्य सरकारांतर्फे होत आहेत.

नववी आणि दहावी मध्ये असे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना पुढील तांत्रिक शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत. भारतीय जीवनशैलीसाठी आवश्यक कौशल्यांचा विकास, उपयोगी तंत्राचे प्रशिक्षण, आवड निर्माण करणारे ओळखीचे असे उपक्रम, सर्वसमावेशक सर्जनशीलता आणि तेही शाळेतच हे सारे बहुविध कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रमामुळे शक्य होते आहे.

पारंपारिक महाविद्यालयीन शिक्षणामध्ये जशा अनेकानेक शाखा आहेत, विविध पर्याय आहेत तसेच भरपूर वैविध्य उच्च-तांत्रिक शिक्षणात देखील आहे. विद्यार्थ्यांना आपण त्याची ओळख करून द्यायला हवी, त्यांचा कल कुठे आहे.. आवड कशात आहे याचा मागोवा घ्यायला हवा. शालेय स्तरावरील व्यवसायलक्षी पायाभूत अभ्यासक्रमाची तयारी विद्यार्थ्यांकडून करवून घेताना आपण त्यांचा सहज ओढा कुणीकडे आहे, हे पाहिले पाहिजे.

चला, आपण सारे हा अभ्यासक्रम अधिक जागरूकतेने राबवूया आणि सर्वांचेच जीवनमान उंचावूयात.

**कौशल्ये शिकूया.. आयुष्य घडवूया..**



## देशात प्रथमच -

# पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना NSQF अंतर्गत मल्टी स्किल व्यवसायलक्षी शिक्षण

पुणे महानगरपालिकेच्या निवडक आठ माध्यमिक शाळांतील एकूण ३७९ विद्यार्थी NSQF अंतर्गत MSFC (मल्टी स्किल फौंडेशन कोर्स) व रिटेल (लेवल–१) या व्यवसायलक्षी विषयात यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले आहेत. या उपक्रमासाठी महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA) अंतर्गत पुणे महानगरपालिका आणि लेंड–अ–हँड इंडिया यांच्या संयुक्त सहकार्याने राज्य शासनाच्या इतर शाळांबरोबर, पुणे महानगरपालिकेच्या एकूण ८ शाळांची निवड व्यवसाय शिक्षणासाठी करण्यात आली.

अभियांत्रिकी तंत्रज्ञान आणि कार्यशाळा, ऊर्जा आणि पर्यावरण, अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान, बागकाम, रोप वाटिका व शेती तंत्रज्ञान असे चार उपविषय असलेला बहुविध कौशल्य (मल्टी–स्कील) आणि रिटेल हा NSQF अभ्यासक्रम महानगरपालिकेतील शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी एका नविन पर्वाची सुरुवात आहे.

या विद्यार्थ्यांची परीक्षा NSDC मान्यताप्राप्त सेक्टर स्किल कौन्सिल आणि राज्य व्यावसायिक परीक्षा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली. या अभ्यासक्रमाला NCERT शी संल्गन असलेल्या पंडित सुंदरलाल शर्मा सेन्ट्रल इंस्टीट्यूट ऑफ वोकेशनल एज्युकेशन तर्फे राष्ट्रीय पातळीवर मान्यता देण्यात आलेली आहे.

हा पूर्ण उपक्रम लेंड–अ–हँड इंडियाने स्वबळाने शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत न घेता राबविला. पहिल्या बॅचचे प्रथम वर्ष नुकतेच यशस्वीरीत्या पूर्ण झाले. विशेष म्हणजे अशा प्रकारे NSQF अंतर्गत MSFC पूर्ण केलेल्या देशातील या पहिल्या शाळा व पहिले विद्यार्थी आहेत.

हा उपक्रम राबविण्यासाठी श्रीमती मीनाक्षी राऊत, शिक्षणाधिकारी (माध्यमिक व तांत्रिक – पुणे महानगरपालिका) आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच डॉ. सुवर्णा खरात (राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान) यांनी खूपच महत्वाच्या भूमिका बजावल्या आणि त्यासाठी त्यांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत.

डॉ. सुवर्णा खरात (राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान) म्हणाल्या, ''व्यवसाय शिक्षण – माध्यमिक स्तर या योजने अंतर्गत स्वयंसेवी संस्थांना सोबत घेऊन राबविला गेलेला हा देशातील पहिलाच प्रयोग असावा. व्यवसाय शिक्षणाचे येणाऱ्या काळातील महत्व विचारात घेता उपक्रमामध्ये पुणे महानगरपालिका व लेंड–अ–हँड इंडियाने दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल आभारी आहे.''

श्रीमती मीनाक्षी राऊत शिक्षणाधिकारी (माध्यमिक व तांत्रिक – पुणे महानगरपालिका) यांनी सांगितले, ''सर्वसामान्य स्तरातून येणाऱ्या व पुणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय शिक्षणाची योग्य सोय प्रथमच उपलब्ध झाली. हा उपक्रम म्हणजे पुणे महानगर पालिका आणि लेंड–अ–हँड इंडिया यांची खऱ्या अर्थाने public-private partnership आहे. विद्यार्थ्यांसाठी NSQF प्रकल्पामुळे बाहेरचे जग शाळेत आणता आले. त्यामुळे विद्यार्थ्यांची आवड व क्षमता विकसित झाली. यामुळे आता विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाची दिशा स्वत: ठरवता येणार आहे. या प्रकल्पामुळे शिक्षण खऱ्या अर्थाने जीवनाभिमुख झाले आहे. या वर्षी सुद्धा १० शाळांमध्ये हा प्रकल्प राबिविण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमामुळे महानगरपालिकेच्या शाळांमधील गुणवत्ता व उपस्थिती तर वाढलीच आहे शिवाय एकूण विद्यार्थी संख्या वाढण्यास मदतच होत आहे. मी अनेक वेळा प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांमधील बदल अनुभवला आहे. प्रत्यक्ष कृतीचा अनुभव, त्यामुळे आलेला आत्मविश्वास, चौकसपणा हे नेहमीपेक्षाचे वेगळेपण या सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसले व त्याची आजच्या शिक्षणात खूपच आवश्यकता आहे यात शंका नाही. ''



**रिटेल मध्ये प्रथम आलेल्या सुप्रिया गीते आणि MSFC मध्ये सर्वप्रथम आलेल्या प्रणय सदांशिव यांचा सत्कार शिक्षणाधिकारी मीनाक्षी राऊत करताना**

# व्यवसाय शिक्षणाचे पुढचे पाऊल - उद्यम



**उद्यम प्रकल्पाच्या शुभारंभ प्रसंगी स्थानिक पंचायत सदस्य आणि इतर मान्यवर**

लेंड-अ-हँड इंडिया द्वारा राबविला जाणारा व्यवसायलक्षी अभ्यासक्रम बहुतेक शाळांमध्ये स्थानिक निदेशकांमार्फत शिकविला जातो. सर्व निदेशक आपापल्या विषयाशी संबंधित तांत्रिक शिक्षण घेतलेले तर असतातच पण त्यांच्या गावामध्ये त्यांच्यापाशी असलेल्या कौशल्यावर आधारित छोटा व्यवसाय करणारेही असतात. अनेकदा असे व्यवसाय करण्यासाठी किंवा आहे तोच व्यवसाय वाढविण्यासाठी जागा, यंत्र-सामुग्री, कच्चा माल यांसाठी भांडवल व उद्योगाच्या योग्य वाढीसाठी, आर्थिक सल्ला, मार्केटिंग साठी मार्गदर्शनाची गरज असते.

लेंड-अ-हँड इंडियाने निदेशकांची हीच गरज ओळखून 'उद्यम' हा प्रकल्प सुरु केला आहे. व्यवसाय सुरु करू इच्छिणाऱ्यांठी अथवा वाढवू पाहणाऱ्या निदेशकांना जर शाळांचा सर्व प्रकारे पाठींबा असेल तर उद्यम अंतर्गत आर्थिक पाठबळ दिले जाणार आहे. उद्यम हा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. ही निव्वळ कर्ज-योजना नाही. उद्यम प्रकल्पाच्या सहाय्याने निदेशकांच्या व्यवसायामुळे शाळा आणि शाळेच्या परीसरातील गावांमध्ये स्थानिक गरजा भागविल्या जातील. शाळेची जागा, तेथील यंत्र-सामुग्री वापरल्याचा मोबदला शाळेला मिळेल. विविध व्यवसाय करताना विद्यार्थ्यांची मदत घेऊन त्यांना व्यवसायाचे प्रात्यक्षिक देता येईल.

कर्नाटक मधील बेळगाव जिल्ह्यातील हुक्केरी तालुक्यामधील नांगनूर येथील पंचक्रोशी विद्यालय इथे उद्यम प्रकल्पाची नुकतीच सुरुवात करण्यात आली. अतुल कुलकर्णी (उर्जा-पर्यावरण), प्रमोद पवार (अभियांत्रिकी), दीपक कदम (शेती-पशुपालन), सविता कुलकर्णी (गृह-आरोग्य) हे चारही निदेशक आता विविध व्यवसायांची आखणी करीत आहेत.

शाळेच्या आसपास असलेल्या गावांच्या गरजा, तेथे उपलब्ध नसलेल्या बाबी, व्यवसायाच्या शक्यता, कालावधी, आर्थिक क्षमता आदींचा प्रथम अभ्यास करून प्रत्येकजण करू इच्छिणाऱ्या व्यवसायांचे प्रकल्प अहवाल तयार करण्यात आले. सर्वप्रथम शाळेतील विद्यार्थिनींसाठी गणवेश शिवण्याची ऑर्डर सविता कुलकर्णी यांना मिळाली. त्यासाठी लागणारी व्यावसायिक शिलाई मशीन, पिको फॉल मशीन तसेच इतर पूरक साहित्य लेंड-अ-हँड इंडियाने पुरविले. शाळेची सुरुवात असल्याने ही ऑर्डर मिळाली, पण आता वर्षभर कार्यरत रहाण्यासाठी सुद्धा आराखडा तयार आहे.

उर्जा-पर्यावरण कार्यशाळेमध्ये घरगुती उपकरणांच्या दुरुस्तीचा उपक्रम सुरु केला जात आहे. यात मल्टी-स्किल कोर्सच्या माजी विद्यार्थ्यांची मदत घेतली जात आहे. सदर शाळा ग्रामीण भागात आहे. अनेक वस्तूंसाठी दूरच्या मोठ्या शहरांकडे जावे लागते. लवकरच येणारे गणपती-नवरात्रोत्सव आदी सणांच्या निमित्ताने गावा-गावांतून कोण-कोणत्या वस्तूंना मागणी असते याचा अंदाज घेऊन त्याप्रमाणे कच्चा माल आणून त्यापासून विविध वस्तू बनविण्याची आखणी केली जात आहे.

शेतीअंतर्गत फुल-शेती, माती परीक्षण आदी जोड-व्यवसाय केले जाणार आहेत. या साठी जिल्हा पातळीवर शेती खात्यासाठी चर्चा चालू आहे. अभियांत्रिकी विभागात कुंपणांसाठी लागणारे पोल, मोटर रिवाइंडिंग, तसेच इतर गरजेच्या वस्तू बनविण्याचे ठरत आहे. या सर्व व्यवसायांची आखणी करताना नफा मिळविण्याकडेही लक्ष पुरविले जात आहे.

निदेशक, शाळा, विद्यार्थी यांनी लेंड-अ-हँड इंडियाच्या सहाय्याने एकत्रितपणे समाजाच्या गरजा स्थानिक पातळीवरच भागविण्याचा हा उद्यमशील प्रयत्न म्हणजे व्यवसाय शिक्षणाचे पुढचे पाऊल आहे.




**उद्यम प्रकल्पांतर्गत नवीन शिवलेला गणवेष विद्यार्थिनीला देऊन शुभारंभ करताना सुनंदा माने**

## हे करून पहा..

**विद्यार्थी मित्रांनो आपण MSFC मुख्यत्वे learning by doing पद्धतीने शिकतो, त्याचे सर्वसाधारण प्रमाण ८०% कृती तर २०% थिअरी असे असते. आपण जे प्रत्यक्ष करतो, घडवतो त्याचे आरेखन (ड्रॉइंग) महत्वाचे, कळीचे असते. प्रत्येक वस्तूचे आकारमान एखादे विशिष्ट असते. ते तसे का असते, याचा आपण सखोल विचार करायला हवा..**

तुमच्या घरात टूथपेस्ट असणारच. तुम्ही तिचं झाकण काळजीपूर्वक पाहिलं आहे का? कसं आहे ते? गोल गरगरीत की वरच्या बाजूला थोडेसे निमुळते होत जाणारे? टूथपेस्ट प्रमाणेच काही औषधी मलमांच्या ट्यूबची झाकणंही अशीच वरच्या बाजूला निमुळती होत गेलेली असतात, हे तुमच्या लक्षात आलंय का? असं का असतं? तर प्रत्येक डिझाइनमधे विज्ञान लपलेलं असतं आणि ते एका सूत्रावर आधारित असतं. आपण सकाळी उठल्यावर प्रथम टूथपेस्ट हातात घेतो, तेव्हा काहींच्या डोळ्यांवर झोपही असते. अशावेळी हे झाकण खाली पडलं तर काय होईल? हे झाकण जर गोल असेल तर ते घरंगळत लांब जाईल. पण ते जर लंबगोल असेल आणि एका बाजूने किंचित निमुळते असेल तर.. ते नक्कीच घरंगळत लांब जाणार नाही. मग काय होईल? कुठे जाईल ते? यासाठीच करा हा गंमत प्रयोग. थोड्याशा उंचीवरुन टूथपेस्टचे झाकण जमिनीवर टाका आणि तुमचं तुम्हीच शोधून काढा, नेमकं काय होतं ते?



टूथपेस्ट प्रमाणेच औषधांच्या विविध मलमांच्या ट्यूब्ज देखील अशाच निमुळत्या झाकणांच्या असतात. आजारी माणसाच्या हातून झाकण पडण्याची शक्यता असते, अशावेळी पडलेले झाकण आजारी माणसाच्या पासून फार लांब जाऊ नये, याची काळजी अशा डिझाईनमागे असते. तेव्हा आरेखन (ड्रॉइंग) म्हणजे निव्वळ आकृती नाही तर त्यामागे सोय – गैरसोय, सुटसुटीतपणा अशा अनेक बाबींचाही विचार करायला हवा, ही सवय लावा.

– राजीव तांबे (rajcopper91@gmail.com)

## करिष्मा रंधवे : २०११ मध्ये लेंड-अ-हँड इंडिया तर्फे सिनसिनाटी विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थिनीशी भेट

लेंड–अ–हँड इंडिया द्वारा IBT / MSFC अभ्यासक्रम शाळा–शाळांतून राबविला जातोच पण त्याच बरोबरीने इतर पूरक प्रकल्प व उपक्रम देखील सुरु असतात.

लेंड-अ-हँड इंडिया कडे सिनसिनाटी विद्यापीठाने भारतातून ग्लोबल ऑपोर्च्युनीटी स्कॉलरशिप साठी दोन विद्यार्थ्यांची निवड करण्याची जबाबदारी सोपवली होती. सदर ग्लोबल स्कॉलरशिप अमेरिकेतील सिनसिनाटी विद्यापीठात पाच वर्षे शिकण्यासाठी असून जाणे–येणे, रहाणे, शिक्षण असा सारा खर्च (तब्बल ६७ लाख) या विद्यार्थ्यासाठी विद्यापीठ देणार होते.



लेंड-अ-हँड इंडियाने ज्या शाळांमध्ये संस्था मल्टी–स्किल कोर्स चालवत आहे त्या शाळांमधूनच ही निवड करण्याबद्दल सिनसिनाटी विद्यापीठाची मान्यता मिळवली व अशा सर्व शाळांना स्कॉलरशिपसाठी योग्य विद्यार्थ्यांचे अर्ज शिफारशींसह करण्यास सुचवले. ६० पेक्षा जास्त अर्जांमधून १६ विद्यार्थ्यांची, लेखी परीक्षा व मुलाखतीनंतर, होम व्हिजीट साठी निवड केली गेली. होम व्हिजीट नंतर दहा विद्यार्थ्यांची नावे विद्यापीठास कळविण्यात आली. या सर्व प्रक्रीयेस जवळ जवळ दहा महिने लागले. सर्वात शेवटी सिनसिनाटी विद्यापीठाने दहा विद्यार्थ्यांपैकी अंजनी लहाणे व करिष्मा रंधवे या दोन विद्यार्थिनींची निवड केली. अंजनी ही माणगाव (जि. रायगड) येशील विद्यार्थिनी तर करिष्मा ज्ञान संवर्धिनी माध्यमिक शाळा, शिरवळ, जि. सातारा येथील विद्यार्थिनी. प्रथम चार वर्षे शिक्षण आणि नंतर एक वर्ष इंटर्नशिप असे स्वरूप असलेल्या ग्लोबल स्कॉलरशिपची चार वर्षे दोघींनी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहेत.

करिष्मा २०११ नंतर प्रथमच भारतात घरी, सुट्टी मध्ये आली असता तिने लेंड–अ–हँड इंडियाच्या पुणे कार्यालयास भेट दिली. करिश्मा रंधवेची संपूर्ण मुलाखत YouTube च्या पुढील लिंकवर पाहता येईल https://www.youtube.com/watch?v=jk9LkLZAOwc&feature=youtu.be

ती बायो मेडिकल सायन्सचे (Bachelor of Applied Science (B.Sc.), Biomedical Sciences, General) उच्च शिक्षण घेत आहे. शिक्षण चालू असतानाच तिने तिथे अर्धवेळ नोकरीदेखील केली. सुरुवातीला तेथील शिक्षण पद्धती, इंग्रजी, वातावरण यांच्याशी जुळवून घेताना खूप त्रास झाला, पण शिकण्याची जिद्द आणि उमेद यांच्या जोरावर चार वर्षांचे शिक्षण पूर्ण केले असून आता ती एक वर्षाची इंटर्नशिपही पूर्ण करणार आहे. तसेच यानंतर ती पदव्युत्तर (मास्टर्स) शिक्षण देखील घेणार आहे. भविष्यात कॅन्सर आजारासंबंधी संशोधन करण्याचा तिचा मानस आहे. करिष्मा रंधवे आणि अंजनी लहाने या दोघींचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!


**लेंड-अ-हँड इंडिया**

Lend-A-Hand India

९, जीवन विहार हौसिंग सोसायटी, प्राईड पॅनोरमा जवळ, ऑफ सेनापती बापट मार्ग, पुणे, महाराष्ट्र – ४११ ०१६. दूरध्वनी : (०२०) २५६३ ००९२, ९५५२२ ४१९०५.

E-mail : lahi@lend-a-hand-india.org | www.lend-a-hand-india.org